**नि. दि. दावा क्र. २५३/२०००.**

**<u>अर्ज नि.क्र. १८१ वरील आदेश</u>**

(दिनांक १९/०९/२०२५ रोजी पारित)

प्रतिवादी क्र.२ व ८ विरुध्द झालेला "कैफीयत नाही" चा आदेश रद्द करुन मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज.

०२. अर्जदार/प्रतिवादी क्र.२ व ८ चे म्हणणे थोडक्यात असे आहे की, त्यांनी नि.क्र.२१ व ३२ प्रमाणे ताकीद अर्जास आपले म्हणणे सादर केले होते. परंतु, त्यानंतर प्रस्तुत खटल्यात कोर्ट कमिशन, मोजणी, हरकती तसेच मुळ वादी, प्रतिवादी यांचे मृत्युपरांत दावा दुरुस्ती वगैरे इत्यादी कारणांमुळे मुळ दाव्यास कैफीयत देण्याचे राहून गेले. त्यामुळे त्यांची कैफीयत दाखल करण्यास साधारणतः २४ वर्षाचा विलंब झाला आहे. शेवटी, त्यांनी असे कथन केले की, कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब हा जाणून बुजून केलेला नाही. त्यामुळे झालेला विलंब माफ होवून त्यांच्या विरुध्दचा "कैफीयत नाही" चा आदेश रद्द करुन कैफीयत दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली. याउलट वादींनी नि.क्र.१८३ प्रमाणे प्रस्तुत अर्जास आपले लेखी म्हणणे सादर करुन सदर प्रतिवादींना कैफीयत देण्यास झालेला विलंब हा कोणतेही रास्त व कायदेशीर कारण नसल्याने अर्ज खारिज करण्यात यावा अशी मागणी केली.

०३. त्यानंतर उभयपक्षा तर्फे त्यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकूण संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले. सदर प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की, त्यांनी नि.क्र.२१ व ३२ प्रमाणे ताकीद अर्जास आपले म्हणणे सादर केले होते. परंतु, अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, केवळ प्रतिवादी क्र.२ यांनीच दि.२७/०७/२००० रोजी नि.क्र.२१ प्रमाणे ताकीद अर्जाला आपले म्हणणे सादर केले. त्यामुळे प्रतिवादी क्र.८ तर्फे ताकीद अर्जाला म्हणणे देखील दाखल नाही. पुढे अभिलेखावरुन असे देखील दिसून येते की, सदर दोन्ही प्रतिवादी विरुध्द "कैफीयत नाही" चा आदेश पारित केल्यानंतर बरेच वर्ष प्रकरण वादींच्या पुराव्याकरीता नेमण्यात आले होते. त्यानंतर प्रस्तुत प्रकरणात वादीसह एकूण चार साक्षीदार अनुक्रमे नि.क्र.१२९, १३४, १३७ आणि १५६ प्रमाणे तपासण्यात आले. त्या सर्वांचा उलट

तपास देखील प्रतिवादीं तर्फे घेण्यात आला आहे. प्रतिवादी तर्फे सा.क्र.४ चा उलट तपास हा दिनांक ०२/११/२०२३ रोजी घेण्यात आला. त्यानंतर वादींनी दि.१४/०३/२०२४ रोजी नि.क्र.१७३ प्रमाणे पुरावा बंद पुरसिस सादर करुन आपल्या पुराव्याची बाजू बंद केली. तेव्हापासून प्रस्तुत प्रकरण हे प्रतिवादींच्या पुराव्या करीता नेमण्यात आले होते.

०४. पुढे रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यानंतर प्रतिवादींनी नि.क्र.१७६, १७७, १७८ आणि १७९ प्रमाणे त्यांचा पुरावा दाखल करण्यास मुदतवाढ अर्ज सादर केले आहेत. ते सर्व अर्ज मंजूर करुन प्रतिवादींना त्यांचा पुरावा दाखल करण्यास वेळोवेळी मुदतवाढ देखील देण्यात आली होती. त्यानंतरच्या तारखांना प्रतिवादींनी पुरावा दाखल करण्यास मुदतवाढ अर्ज देखील सादर केले नाहीत. त्यामुळे दि.०२/०८/२०२४ पासून प्रस्तुत प्रकरण प्रतिवादींचा पुरावा बंद करण्याच्या आदेशा करीता नेमण्यात आले होते. परंतु, शेवटी प्रतिवादींनी दि.२०/०९/२०२४ रोजी नि.क्र.१८० प्रमाणे पुन्हा मुदतवाढ अर्ज सादर केला. प्रस्तुत अर्ज शेवटची संधी म्हणून मंजूर करण्यात आला. परंतु, त्यानंतर देखील प्रतिवादींनी पुरावा दाखल न करता सदर प्रतिवादीं विरुध्द झालेला "कैफीयत नाही" चा आदेश रद्द करुन मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज नि.क्र.१८१ सादर केला.

०५. उपरोक्त चर्चेवरुन असे दिसून येते की, सदर प्रतिवादीं विरुध्द "कैफीयत नाही" चा आदेश पारित केल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात झालेल्या संपूर्ण घडामोडीबाबत प्रतिवादींना माहिती होती. अशा परिस्थितीत सदर प्रतिवादींनी वाजवी कालावधीत त्यांच्या विरुध्दचा "कैफीयत नाही" चा आदेश रद्द करुन मागणे अभिप्रेत होते. परंतु, वाजवी कालावधीत तसा कुठलाही अर्ज न करता प्रदीर्घ काळानंतर प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. शिवाय, कैफीयत दाखल करण्यास झालेल्या प्रदिर्घ विलंबा बाबतची कारणे देखील अभिलेखावरील परिस्थितीवरुन मुळीच पुरेशी ठरत नाहीत. त्यामुळे, सबळ कारणा अभावी प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

कराड. (एस.डी. कु-हेकर)

दिनांक :- १९/०९/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, कराड.